# कला, वाणिज्य महाविद्यालय, मायणी.
## १० वे ग्रामीण साहित्य संमेलन
### दि. १५ फेब्रुवारी, २०१८

**- अहवाल -**

महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींना कथा-कविता आदी वाड्मय प्रकारांचा प्रत्यक्ष आस्वाद घेता यावा आणि त्यांच्या अंगी असणाऱ्या लेखन गुणांना प्रोत्साहन मिळावे, या हेतूने महाविद्यालयात प्रतिवर्षी ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. चालू वर्षी अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत गुरुवार दि. १५ फेब्रु., २०१८ रोजी एक दिवसीय ग्रामीण साहित्य संमेलन पार पडले. यावर्षी संमेलनाध्यक्ष म्हणून कवी गोविंद पाटील (गारगोटी) यांची निवड करण्यात आली. त्यांचे यापूर्वी 'गावकीर्तन', 'उध्वस्त ऋतूंच्या कविता' आणि 'धूळधाण' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. ते अनेक पुरस्कारांचे मानकरी आहेत. संमेलनाचे नियोजित स्वागताध्यक्ष श्री. सुरेंद्र गुदगे (चेअरमन, मा.भा.शि.प्र.मंडळ, मायणी) हे काही अडचणीमुळे येऊ शकले नाहीत, त्यामुळे ती जबाबदारी संस्थेचे संस्थापक सचिव श्री. सुधाकर कुबेर यांनी पार पाडली.

संमेलनाध्यक्ष श्री. गोविंद पाटील म्हणाले, " समाजाच्या सर्व स्तरातून लिहिणारे लोक पुढे येत आहेत. परंतु गांभीर्याने, विचारपूर्वक ही लेखनकृती करणारे मोजकेच आहेत. वॉट्सअप व फेसबुकच्या जमान्यात सर्व क्षेत्रांप्रमाणे साहित्यातही प्रदूषण वाढले आहे. आम्ही ज्ञानेश्वर, तुकारामांचा वारसा सांगतो, परंतु स्वतःचा जीव धोक्यात घालून परखड सत्य मांडणे कठीण आहे. आजच्या काळात समाजाशी बांधिलकी असणाऱ्या लेखकांची गरज आहे."

स्वागताध्यक्ष सुधाकर कुबेर म्हणाले, " साहित्य हे बालमनावर संस्कार करणारे माध्यम आहे. शालेय जीवनात साहित्याची आवड निर्माण झाली, तर आयुष्यभर ते संस्कार टिकून राहतात. कुसुमाग्रजांच्या कविता आजही मनाला आनंद देतात. 'औदुंबर' या कवितेने निसर्गाचे एक अद्भूत व मनोरम चित्र उभे केले आहे."

याच सत्रात मायणीचे सुपुत्र बाळासाहेब कांबळे यांच्या 'असे घडले महापुरुष' या पुस्तकाचे प्रकाशन घेण्यात आले. याप्रसंगी लेखक बाळासाहेब कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी सत्काराला उत्तर दिले. या पुस्तकावर बोलताना समीक्षक डॉ. दिनेश वाघुंबरे म्हणाले, " भगवान बुद्धांपासून अण्णा भाऊ साठेंपर्यंत अनेक महामानवांनी हे जग सुंदर करण्याचा प्रयत्न केला. अशा २२ महामानवांची जडणघडण स्पष्ट करणारे सापेक्ष लेखन, असे या पुस्तकाचे वर्णन करता येईल. या पुस्तकातून विद्यार्थी, शिक्षक आणि स्पर्धा परीक्षेला सामोरे जाणारे युवक यांना प्रेरणा मिळू शकते. उत्तम रेखाचित्रे, आकर्षक मांडणी व दर्जेदार निर्मितीमूल्य असणाऱ्या या पुस्तकाला नागनालंदा प्रकाशनाने सुंदर रूप दिले आहे."

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात साहित्य चर्चा घेण्यात आली. त्यामध्ये मुधोजी कॉलेज फलटणचे डॉ. प्रभाकर पवार यांनी 'साहित्याने समाजाला काय दिले?' या विषयावर आपले विचार मांडले. ते म्हणाले, " साहित्याने समाजाला स्वातंत्र्याची आणि मानवतेची जाणीव करून दिली. त्यामुळे दबलेले लोक जागे झाले. समाजाला माणुसकीचा चेहरा मिळाला. समाजाला आरसा दाखविण्याचे काम साहित्याने केले. त्यामुळेच नवी संस्कृती, नवे समाजजीवन घडू शकले. शंकरराव खरात, उत्तम बंडू तुपे, व्यंकटेश माडगुळकर आदींनी हा परिसर साहित्यातून जीवंत केला आहे. आपण तो वाचला पाहिजे."

Scanned with Oken Scanner

तिसऱ्या सत्रात कथाकार रवी राजमाने यांचे बहारदार कथाकथन झाले. त्यांनी आपल्या कथेद्वारे श्रोत्यांना हसविले आणि रडविलेसुद्धा. चौथ्या सत्रात कवी प्रा. विजय शिंदे (आटपाडी) यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन झाले. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन डॉ. हेमांगिनी माने यांनी केले. यामध्ये कवी किरण अहिवळे (पळसगांव), श्रेया देशमुख, विठ्ठल भागवत (विटा), शाहीर नारायण कदम (धोंडेवाडी), कुंदा लोखंडे, रंजना सानप, श्रीमयी दिवटे, सानिका त्रिंबके, जोतिराम बागल, भगवान वायदंडे, संजय जगताप, मिलींद कांबळे, प्रकाश शिंदे आदी मान्यवरांनी सहभाग घेतला.

संमेलनासाठी संस्थाचालक श्री. एन.व्ही. कुबेर, श्री. ए.टी.पुस्तके, श्री. दिगंबर पिटके, कवी बाळ पोतदार, प्राचार्या प्रतिभा इनामदार आदी मान्यवर उपस्थित होते. संमेलनासाठी १३८ विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली. याशिवाय परिसरातील रसिक श्रोते पालक, पत्रकार, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर यांचे ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी प्रा. शिवशंकर माळी, डॉ. शौकतअली सय्यद, डॉ. विजया कदम व सर्व प्राध्यापक वृंद यांनी परिश्रम घेतले. संमेलनस्थळी विज्ञान विभागाचे प्रा. कालिदास सरकाळे व प्रा. प्रतीक कांबळे यांनी प्रबोधनपर चित्रांचे प्रदर्शन भरविले. त्याालाही उत्तम प्रतिसाद मिळाला. प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी यांनी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

समन्वयक

(डॉ. श्यामसुंदर मिरजकर)

Principal
Art's,Commerce College,
Mayani,Tal-Khatav(Satara)

Scanned with Oken Scanner